# विशेष दिवाणी दावा क्र.२५/२०२१ मधील नि.१० खालील आदेश.

**(CNR-MHAH23000058-2021)**

१. वादी यांनी प्रस्तुतचा दावा खरेदीखत करुन मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. तसेच वादी यांनी प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेकरीता नि. ५ वर अर्ज दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी यांना समन्सची बजावणी झाली असून दिनांक ५/७/२०२१ रोजी ते हजर झाले व म्हणणे देण्यास मुदत घेतली. वादी यांनी प्रस्तुतचा नि. १० वरील अर्ज देवून नि. ५ वरील चौकशी होईपर्यंत प्रतिवादी यांचेविरुध्द जैसे थै परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश पारित करण्याकरीता दिला आहे. प्रतिवादी यांचे म्हणणे घेतले. प्रतिवादी यांना संधी देवूनही सदर अर्जावर म्हणणे दिले नाही. वादी यांचे कथन की, दिनांक ७/११/२०१३ रोजी त्यांनी प्रतिवादीचे लाभात खरेदीखत करुन दिले असून सदर खरेदीखताचे परिच्छेद क्र. ४ मध्ये असे नमूद केले आहे की, 'लिहुन घेणार यांना सदर जमीन भविष्यात विक्री करावयाची असल्यास ती परत लिहुन देणार यांना विक्री करावयाची आहे.' वादी यांचे कथन की, प्रतिवादी हे दावा मिळकत त्रयस्थ इसमास विक्री करण्याचे तयारीत आहेत व त्या अनुषंगाने दिनांक ६/६/२०२१ रोजी विसार दाखल काही रक्कम स्वीकारणार असल्याचे त्यांना समजले आहे. प्रतिवादी यांनी त्रयस्थ इसमास खरेदीखत करु नये म्हणून त्यांनी दिनांक ३०/५/२०२१ रोजी दैनिक प्रभात या वर्तमानपत्रात जाहिर नोटीस प्रसिध्द करुन दावा मिळकत प्रतिवादीकडुन खरेदी करण्याबाबत हरकत नोंदवली आहे. तसेच दिनांक ३१/५/२०२१ रोजी प्रतिवादी यास वकीलामार्फत नोटीस पाठवली आहे व ती त्यांना मिळाल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दिले नाही. एकंदरीत, प्रतिवादी यांनी अर्जातील कथन नाकारले नसल्याने ते दावा मिळकत त्रयस्थ

इसमास विक्री करत असल्याबाबतची भिती वादी यांना आहे व तशी शक्यता नाकारता येत नाही अशी वादी यांची खात्री असल्याचे दिसून येते. सबब, प्रतिवादी यांनी नि. ५ वरील अर्जास म्हणणे देईपर्यंत जैसे थे परिस्थिती ठेवण्याबाबतचे आदेश पारित करणे आवश्यक आहे असे माझे मत झाले आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. वादीचा नि. १० वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी नि. ५ वरील अर्जास म्हणणे देईपर्यंत आज रोजी असलेली परिस्थिती कायम ठेवण्याबाबत 'जैसे थे' आदेश त्यांचेविरुध्द पारित करण्यात येत आहे.

३. सदर आदेशाबाबत प्रतिवादी यांना कळवून त्याबाबतचा अहवाल वादी यांनी पुढील तारखेपर्यंत न्यायालयात दाखल करावा.

श्रीगोंदा.
दिनांक १३/०७/२०२१.

**( संग्राम एस. शिंदे )**
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.